# विद्यापीठीय बॅडमिंटन स्पर्धेत देगलूर महाविद्यालयाच्या मुलांच्या संघास प्रथम पारितोषिक



देगलूर- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ब विभागीय बॅडमिंटन स्पर्धेत देगलूर महाविद्यालयाच्या मुलांच्या संघास प्रथम पारितोषिक प्राप्त झाले आहे.

या संघाचे प्रशिक्षक म्हणून डॉ. निरजकुमार उपलंचवार यांचे मार्गदर्शन लाभले असून, या संघात प्रतिनिधित्व करणारे देगलूर महाविद्यालयतील खेळाडू सुनेवार अनिकेतन किशनराव, विलास पोकर्ने, अश्वजीत वाघमारे, विशाल स्वामी, सिद्धार्थ सोनकांबळे यांनी संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांचे आड्डत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, नारायणराव मैलागीरे, सूर्यकांत नारलावार, विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, देवेंद्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्रअप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य निवृत्ती गोविंदवार, लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार, प्रा. एस. एम. देबडे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी अभिनंदन केले आहे.